# मायक्रोफायनान्स पल्स

**अंक 8 - एप्रिल 2021**



# वैश्लेषिक संपर्क


## इक्विफॅक्स

किरण समुद्रला उपाध्यक्ष वैश्लेषिक

kiran.samudrala@equifax.com

श्रुती जोशी
सहाय्यक उपाध्यक्ष - वैश्लेषिक

shruti.joshi@equifax.com

ख्याती खजुररया सहाय्यक प्रबंधि - वैश्लेषिक
khayati.khajuria@equifax.com

वंदना पांचाळ वरिष्ठ कार्यकारी - वैश्लेषिक
vandana.panchal@equifax.com

## सिडबी

कैलाश चंद्र भानू मुख्य महाव्यवस्थापक - इआरडीएवी
erdav@sidbi.in

रंगदास प्रभावती उप महाव्यवस्थापक - इआरडीएवी
erdav@sidbi.in

रमेश कुमार
सहाय्यक व्यवस्थापक - इआरडीएवी
rameshk@sidbi.in


"मायक्रोफायनॅन्स पल्सच्या मागील आवृत्या हिंदी, इंग्रजी, मणिपुरी, तेलगू, आसामी, तामिळ, गुजराती, बंगाली, पंजाबी, ओडिया, मराठी आणि बोडो या १२ भारतीय भाषांमध्ये उपलब्ध असून त्या https:// https://www.sidbi.in/en/microfinance-pulse-all-edition या वेबलिंक वर उपलब्ध आहेत "

# अनुक्रमणिका


- कार्यकारी सारांश 04
- संक्षेप आणि शब्दावली 06
- सूक्ष्मवित्त उद्योगाचे अवलोकन 07
- वितरणाचे कल 10
- उद्योग जोखमीची प्रोफाइल 14
- भौगोलीक व्याप्ती 17
- सर्वसमावेशक राज्य प्रोफाईल :महाराष्ट्र 20
- महत्वाकांक्षी जिल्हे 25
- आसाम आढावा 27



# कार्यकारी

# कार्यकारी सारांश

मायक्रोफायनॅन्स पल्सच्या 8 व्या आवृत्ती मधे सूक्ष्मवित्त उद्योगाचा 31 डिसेंबर 2020 पर्यंतचा आढावा दिला आहे. मायक्रोफायनान्स पल्स सूक्ष्म वित्त क्षेत्रातील ऋणकोचा कल आणि येणाऱ्या काळातील संभावना दर्शवते तसेच अलिकडच्या काळातील सूक्ष्मवित्त उद्योग क्षेत्रातील विविध कलांचा संग्रह दर्शविते.

सन 2020 कॅलेंडर वर्षाच्या अखेरीस सूक्ष्मवित्त उद्योगाने 6 करोड सक्रिय कर्जदारांची संख्या गाठली आहे. डिसेंबर 2020 ला सूक्ष्मवित्त उद्योगाचे कर्ज ₹ 228,818 करोड आहे. पोर्टफोलियो शिललाबाकी मधे डिसेंबर 2019 च्या तुलनेत डिसेंबर 2020 मधे 16% नी वाढ झाली. बँका, एकूण पोर्टफोलियो शिल्लकबाकी मधे 42% तर 39% सक्रिय कर्जदारांना योगदान देऊन अग्रणी आहेत

ऑक्टोबर, नोव्हेंबेर, डिसेंबर 20 (OND'20) मध्ये कर्जवितरणामध्ये भरघोस  वाढ झाली असून बँकांनी कोविड-पूर्व पातळीपेक्षा जास्त कर्ज वितरीत केल आहे. मागील तिमाहीच्या तुलनेत, OND'20 मध्ये एकूण कर्जरकमेच्या वितरणामध्ये 84% वाढ झाली तर वितरित कर्ज संखेमधे 97% वाढ झाली. OND'20 मधे OND'19 च्या वर्षगतवर्ष(YoY) तुलनेत सर्वात जास्त म्हणजे 240% वाढ ही 0 हजार - 10 हजार श्रेणी तिकिट आकाराच्या कर्जामधे दिसून आली. सरासरी तिकिटाच्या आकारात (ATS)  वर्षगतवर्ष तुलनेत OND'20 मधे 5% नकारात्मक वाढ दिसून आली. डिसेंबर 20 मधे इंडस्ट्री 1+ कसूर दर हा सर्वात जास्त म्हणजे  20.68% होता. बँक वगळता इतर सर्व क्षेत्रांनी  60 हजार+ तिकिट आकाराच्या कर्ज श्रेणीमधे 90+ कसूर दर योग्य प्रमाणात राखला आहे.

अखिल भारतीय पोर्टफोलिओ विभागात 5 सर्वोच्च राज्यांचे एकूण योगदान 55% आहे. पोर्टफोलिओ शिल्लकबाकीसाठी पश्चिम बंगालचे सर्वाधिक 15% योगदान आहे. डिसेंबर 2020 ला 5 उच्चतम राज्यांमधे, तमिळनाडूमध्ये सर्वात कमी 2.36% 90+ कसूर दर होता तर पश्चिम बंगाल मधे डिसेंबर 2020ला तो सर्वात जास्त 8.97% होता. डिसेंबर 2020 मध्ये महत्वाकांक्षी जिल्ह्यांचा एकूण शिल्लकबाकी पोर्टफोलिओ ₹28,256 करोड असून यामधे 42% हिस्सा बँकांचा तर त्याखालोखाल 36% NBFC-MFI चा आहे. महत्वाकांक्षी  जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक 90+ कसूर दर हा  NBFC-MFI चा आहे.

अखिल भारतीय MFI पोर्टफोलिओ विभागात 31 डिसेंबर 2020 ला सक्रिय कर्ज आणि शिल्लकबाकी पोर्टफोलिओ मधे महाराष्ट्राच 7 % योगदान आहे. डिसेंबर 2019 ते डिसेंबर 2020 या कालावधीत महाराष्ट्राची वर्षगतवर्ष तुलनात्मक वाढ 17% आहे. इतर ऋणकोंच्या तुलनेत महाराष्ट्रात NBFC चा सरासरी तिकिट आकार (ATS) सर्वाधिक आहे. संपूर्ण भारतच्या 90+ कसूर दर तुलनेत महाराष्ट्राचा कसूर दर जास्त आहे. देशभराच्या कर्ज वितरण संख्येतील वर्षगतवर्ष तुलनात्मक 3% वाढीच्या संदर्भात महाराष्ट्रात कर्जवितरण संख्येत वर्षगतवर्ष तुलनेत 11.5% नी घट झाली.

डिसेंबर 2019  ते डिसेंबर 2020  या कालावधीत आसाममधे  शिल्लकबाकी पोर्टफोलिओत  5% नकारात्मक वाढ दिसून आली आहे. डिसेंबर 2019 च्या तुलनेत आसाममधे डिसेंबर 2020 मध्ये 90+ कसूर दरात सर्वच  क्षेत्रांत वाढ झाली आहे. आसाममधे OND '20 मधे कर्ज मागणी  OND'19  च्या तुलनेत 79% वाढली  आहे.

# संक्षेप आणि शब्दावली

- ATS एटिस (सरासरी तिकीट आकार) = वितरित कर्ज रक्कम / कर्जांची संख्या
- DPD डीपीडी = परतावा दिनांक उलटल्यानंतरचे दिवस
- सदयकालीन शिल्लकबाकी पोर्टफोलियो किंवा उधारकर्ता किंवा सक्रीय कर्ज = 0 ते 179 डीपीडी + नवी खाती + वर्तमान खाती
- MFI एमएफआय = मायक्रोफायनान्स संस्था
- POS पी ओ एस = शिल्लकबाकी पोर्टफोलियो
- UT यू टी = केंद्रशासित प्रदेश
- AD महत्वाकांक्षी जिल्हे (एडी) - आरोग्य व आहार, शिक्षण, कृषी आणि जलस्त्रोत, वित्तीय समावेश, कौशल्य विकास आणि पायाभूत सुविधांसारख्या संयुक्त निर्देशकांच्या दृष्टीने मानव विकासांक वृद्धीच्या सुधारणेसाठी जानेवारी 2018 मध्ये नीती आयोग, भारत सरकारने निश्चित केलेले जिल्हे (सध्या संख्येने 117).

- 1-179 = 1 to 179 डीपीडी/ सदयकालीन पीओएस
- 1-29 = 1 to 29 डीपीडी/ सदयकालीन पीओएस
- 30-59 = 30 to 59 डीपीडी/ सदयकालीन पीओएस
- 60-89 = 60 to 89 डीपीडी/ सदयकालीन पीओएस
- 90-179 = 90 to 179 डीपीडी/ सदयकालीन पीओएस
- 30+ कसूर = 30-179 डीपीडी/ सदयकालीन पीओएस
- 90+ कसूर = 90-179 डीपीडी/ सदयकालीन पीओएस


- OND’19 ओएनडी’19 = ऑक्टोबर 2019 ते डिसेंबर 2019
- JFM’20 जेएफएम’ 20 = जानेवारी 2020 ते मार्च 2020
- AMJ’20 एएमजे ’20 = एप्रिल 2020 ते जून 2020
- JAS’20 जेएएस’=20 = जुलै 2020 ते सप्टेंबर 2020
- OND’20 ओएनडी’20 = ऑक्टोबर 2020 ते डिसेंबर 2020




# सूक्ष्मवित्त उद्योग अवलोकन

# सूक्ष्मवित्त उद्योगाचे आशुचित्र - 31 डिसेंबर 2020 पर्यंत

आलेख-01




| सूक्ष्मवित्त उद्योग आशुचित्र -31डिसेंबर 2020 | Banks | SFBs | NBFC-MFIs | NBFCs | Not for Profit MFIs | Total Industry |
|---|---|---|---|---|---|---|
| अनन्य सक्रिय ऋणको('000) | 26,230 | 13,961 | 25,322 | 7,534 | 827 | 73,874 |
| सक्रिय कर्ज ('000) | 40,008 | 17,460 | 36,459 | 8,075 | 1,076 | 103,078 |
| पोर्टफोलियो (₹ करोड) | 96,683 | 38,109 | 73,166 | 18,988 | 1,872 | 228,818 |
| वितरितरक्कम (₹करोड)-OND'20 | 32,395 | 7,741 | 21,043 | 2,427 | 575 | 64,181 |
| सरासरी तिकीट आकार (₹) ATS-OND'20 | 31,955 | 37,481 | 33,177 | 40,906 | 32,519 | 33,227 |
| 30+ कसूर (POS) | 14.63% | 10.40% | 13.44% | 11.30% | 3.53% | 13.18% |
| 90+ कसूर (POS) | 4.84% | 4.44% | 6.19% | 2.27% | 1.37% | 4.96% |

कोष्टक-01


- 31 डिसेंबर 2020 पर्यंत सूक्ष्मवित्त उद्योगाचा एकूण पोर्टफोलियो(BookSize) ₹228,818 कोटी आहे या मधे 42टक्के तर सक्रिय कर्जात 39टक्के योगदान देऊन बँका अग्रणी आहेत.
- कर्जवितरण रकमेमधे 33टक्के योगदान देऊन OND'20 तिमाहीत NBFC-MFI दुसरे सर्वाधिक योगदान देणारे आहेत.
- NBFCचा एटीएस (ATS) उद्योगाच्या एटीएसपेक्षा 23टक्के जास्त आहे
- एकूण सूक्ष्मवित्त उद्योगाच्या तुलनेत, NBFC आणि ना-नफा MFI यांनी 90+ कसूरदर चांगल्या प्रकारे राखला आहे.

टीप :MFI विभागात ग्राहकांचा .करोड अनन्य सक्रिय कर्जदार आहेत 6SFB, Banks, NBFC-MFI, NBFC आणि ना नफा-MFI बरोबर असणाऱ्या बहुविध संबंधामुळे ग्राहकांच्या अनन्य संख्येत फरक आहे.

# सूक्ष्मवित्त उद्योग अवलोकन

आलेख-02

कर्जदाता प्रकारानुसार बाजारांशाचा कल




पोर्टफोलियो शिल्लकबाकी ₹ करोड

| Particulars | Dec' 19 | Mar' 20 | Jun' 20 | Sep' 20 | Dec' 20 |
|---|---|---|---|---|---|
| Banks | 78,522 | 81,001 | 91,920 | 93,409 | 96,683 |
| SFBs | 34,964 | 38,986 | 39,225 | 42,682 | 38,109 |
| NBFC-MFIs | 62,982 | 72,110 | 71,342 | 70,142 | 73,166 |
| NBFCs | 18,753 | 18,073 | 19,875 | 19,838 | 18,988 |
| ना-नफा MFI | 1,599 | 1,679 | 1,842 | 1,772 | 1,872 |
| एकूण उद्योग | 196,820 | 211,849 | 224,204 | 227,843 | 228,818 |
| तिमाही-दर-तिमाही वृद्धी % | - | 8% | 6% | 2% | 0% |

कोष्टक-02


- सूक्ष्मवित्त उद्योग डिसेंबर 2019 ते डिसेंबर 2020 या काळात 16टक्के नी वाढला आहे.
- डिसेंबर 2019 ते डिसेंबर 2020 या काळात सर्व कर्जदात्यांमधे बँकाची सर्वात जास्त 24टक्के वर्षगतवर्ष वाढ दिसून आली.




# वितरणाचे कल

# वितरणाचे कल - संस्था निहाय

आलेख-03





वितरित कर्ज संख्या (लक्ष)

| कर्जदाता प्रकार | OND' 19 | JFM' 20 | AMJ' 20 | JAS' 20 | OND' 20 |
|---|---|---|---|---|---|
| Banks | 74 | 83 | 14 | 47 | 101 |
| SFBs | 30 | 31 | 5 | 12 | 21 |
| NBFC-MFIs | 69 | 71 | 2 | 32 | 63 |
| NBFCs | 12 | 11 | 1 | 5 | 6 |
| ना-नफा MFIs | 3 | 2 | 1 | 2 | 2 |
| एकूण उद्योग | 188 | 198 | 23 | 98 | 193 |

कोष्टक-03

- बँकानी कोविड-पूर्व पातळीपेक्षा जास्त कर्ज वितरीत केल्याने, OND'20 मध्ये वितरित कर्ज संख्येमधे पलटाव येऊन तीव्र प्रमाणात वाढ दिसत आहे. NBFC-MFI कोविड-पूर्व स्तरावर परत येत आहेत. NBFC आणि SFBनी JAS'20 च्या तुलनेत जास्त कर्ज वितरित केले असले तरी अद्याप त्यांनी कोविड-पूर्व पातळी साध्य केली नाही.
- मागील तिमाहीच्या तुलनेत OND'20 मध्ये कर्जरकमेच्या वितरणामध्ये 84टक्के वाढ झाली तर वितरित कर्ज संख्येमधे 97टक्के नी वाढ झाली.
- OND'20 मध्ये कर्जाच्या वितरणामध्ये आणि वितरित रकमेमध्ये बँकेचा बाजाराचा हिस्सा 50टक्के पेक्षा जास्त आहे

# सूक्ष्मवित्त उद्योग तिकीट आकाराचे कल




वितरित कर्ज संख्या (लक्ष)


| तिकीटआकार श्रेणी | OND' 19 | JFM' 20 | AMJ' 20 | JAS' 20 | OND' 20 | Y-o-Y growth rate % |
|---|---|---|---|---|---|---|
| 0K-10K | 10 | 9 | 2 | 4 | 34 | 240% |
| 10K-20K | 12 | 11 | 10 | 15 | 20 | 67% |
| 20K-30K | 48 | 46 | 2 | 18 | 32 | -33% |
| 30K-40K | 60 | 62 | 3 | 24 | 42 | -30% |
| 40K-50K | 29 | 32 | 2 | 18 | 28 | -3% |
| 50K-60K | 14 | 19 | 2 | 10 | 18 | 29% |
| 60K Plus | 15 | 19 | 2 | 9 | 19 | 27% |
| एकूण | 188 | 198 | 23 | 98 | 193 | 3% |
| तिमाही-दर-तिमाही वितरण वृद्धी दर % | - | 5% | -88% | 326% | 97% | - |
| अखिल भारतीय एटीएस (₹) | 34,904 | 36,842 | 28,640 | 35,620 | 33,227 | -5% |
| तिमाही-दर-तिमाही एटीएस वृद्धी दर % | - | 6% | -22% | 24% | -7% | - |

कोष्टक-04

- सर्वाधिक वर्षगतवर्ष 240टक्के वाढ ही OND'19 ते OND'20 या काळात 0K-10K तिकिट आकाराच्या कर्ज श्रेणीमधे झाली आहे.
- सर्वाधिक कर्ज 30K-40K तिकिट आकाराच्या श्रेणीमधे दिले जाते.
- OND'19 मधील ATS ₹ 34,904 वर्षगतवर्ष 5टक्के नी घसरून OND'20 मध्ये ₹33,227 झाली आहे.

# सरासरी तिकीट आकारातील कल

आलेख-05




सरासरी तिकीट आकार (₹)

| कर्जदाता | OND' 19 | JFM' 20 | AMJ' 20 | JAS' 20 | OND' 20 | वर्षगतवर्ष वृद्धीदर % |
|---|---|---|---|---|---|---|
| Banks | 40,528 | 43,281 | 31,493 | 38,588 | 31,955 | -21% |
| SFBs | 34,551 | 34,615 | 25,450 | 33,032 | 37,481 | 8% |
| NBFC – MFIs | 28,941 | 30,485 | 28,339 | 32,855 | 33,177 | 15% |
| NBFCs | 36,252 | 37,776 | 19,627 | 33,940 | 40,906 | 13% |
| ना-नफा MFIs | 30,230 | 26,883 | 13,149 | 29,670 | 32,519 | 8% |
| अखिल भारतीय | 34,904 | 36,842 | 28,640 | 35,620 | 33,227 | -5% |

कोष्टक-05

- सर्व कर्जदात्यामधे OND'20 मधे NBFC ची ATS सर्वात जास्त आहे.
- बँकात नकारात्मक 21 टक्के वाढ OND'19 ते OND'20 या काळात दिसून आली.
- OND'19 ते OND'20 या काळात सर्वात जास्त 51 टक्के वर्षगतवर्ष वाढ NBFC-MFI मधे दिसली.

EQUIFAX

sidbi




# उद्योग जोखमीची

## प्रोफाइल

# कसूर कल

आलेख-06




परतावादिनांक उलटल्यानंतरच्या दिवसात कसूर

| तिमाही | 1-29 days past due | 30-59 days past due | 60-89 days past due | 90-179 days past due | 1-179 days past due |
|---|---|---|---|---|---|
| Dec' 19 | 1.27% | 0.60% | 0.30% | 0.51% | 2.69% |
| Mar' 20 | 2.06% | 0.50% | 0.42% | 0.86% | 3.84% |
| Jun' 20 | 1.30% | 1.03% | 0.43% | 0.43% | 3.20% |
| Sep' 20 | 15.35% | 3.47% | 0.39% | 0.63% | 19.83% |
| Dec' 20 | 7.50% | 4.73% | 3.49% | 4.96% | 20.68% |


कोष्टक-06

- डिसेंबर 20 मधे इंडस्ट्री 1+ कसूर दर हा सर्वात जास्त म्हणजे 20.68टक्के होता.
- 1-29 DPD श्रेणीत सर्वात जास्त कसूर दर डिसेंबर 20 मधे होता. कसूर खात्यांच्या उच्च DPD श्रेणीतील झालेल्या बदलामुळे सप्टेंबर 2020 च्या तुलनेत घसरण दिसत आहे.

टीप : कसूर परिगणनाधारित पोर्टफोलियो शिल्लकबाकी

# 90+ कसूर - 31 डिसेंबर 2020 रोजी

आलेख-07




| कर्जदाता | 0K-10K | 10K-20K | 20K-30K | 30K-40K | 40K-50K | 50K-60K | 60K Plus |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Banks | 0.36% | 2.32% | 3.87% | 3.03% | 2.27% | 3.34% | 7.74% |
| SFBs | 1.39% | 3.40% | 7.91% | 4.90% | 3.86% | 3.30% | 2.86% |
| NBFC-MFIs | 4.29% | 7.26% | 7.93% | 6.72% | 6.45% | 5.34% | 2.61% |
| NBFCs | 30.37% | 9.47% | 4.41% | 3.00% | 0.85% | 1.46% | 1.40% |
| ना-नफा MFIs | 1.28% | 2.12% | 4.48% | 1.32% | 1.71% | 0.83% | 0.52% |

कोष्टक-07

- कर्जदात्यांच्या कसूर आणि तिकिट आकार यांचे विश्लेषण दर्शविते की NBFC-MFI चा एकूणच 90+ कसूर दर सर्वात जास्त आहे. 90+ कसूर दर हा सर्वच तिकीट श्रेणीत दिसत आहे परंतु NBFC चा 90+ कसूर दर सर्वात कमी आहे. 90+ कसूर दर हा मुख्यतः कमी आकाराच्या तिकिट श्रेणीत उदा. 0K-10K आणि 10K-20K केंद्रित झालेला दिसतो.


- बँक वगळता इतर सर्व कर्जदात्यानी 60 हजार+ तिकिट आकाराच्या कर्ज श्रेणीमधे 90+ कसूर दर योग्य प्रमाणात राखला आहे.

टीप : कसूर परिगणनाधारित पोर्टफोलियो शिल्लकबाकी




# भौगोलीक
## व्याप्ती

# राज्य/केंद्रशासित प्रदेशनिहाय पोर्टफोलियो शिल्लकबाकी - 31 डिसेंबर 2020 पर्यन्त




- डिसेंबर 2020 ला सूक्ष्मवित्त उद्योगाचे कर्ज ₹ 228,818 कोटी आहे
- अखिल भारतीय पोर्टफोलिओ मधे 5 सर्वोच्च राज्यांचे (पश्चिम बंगाल ,तमिळनाडू ,बिहार,कर्नाटक आणि महाराष्ट्र ) एकूण योगदान 55टक्के आहे
- बहुतांशी राज्यांची पोर्टफोलियो शिल्लकबाकी ₹5000 करोड पेक्षा जास्त आहे.
- एकूण पोर्टफोलियो शिल्लकबाकी मधे पश्चिम बंगालच सर्वात जास्त 15टक्के योगदान आहे.


# राज्य/ केंद्रशासित प्रदेशनिहाय 90+ कसूर - 31 डिसेंबर 2020 पर्यंत




- संपूर्ण भारताचा डिसेंबर 2020 मधे 90+ कसूरदर 4.96%
- डिसेंबर 2020 ला 5 सर्वोच्च राज्यामधे तामिळनाडूचा 90+ कसूरदर सर्वात कमी 2.36%
- डिसेंबर 2020 ला 5 सर्वोच्च राज्यामधे पश्चिम बंगालचा 90+ कसूरदर सर्वात जास्त 8.97%

टीप : कसूर परिगणनाधारित पोर्टफोलियो शिल्लकबाकी

.





# सर्वसमावेशक राज्य प्रोफाईल:

## महाराष्ट्र

# महाराष्ट्र : राज्य दृष्टिक्षेप

आलेख-08




| दृष्टिक्षेपातील महाराष्ट्र डिसेंबर 2020 | Banks | SFBs | NBFC-MFIs | NBFCs | ना-नफा MFIs | Industry |
|---|---|---|---|---|---|---|
| सक्रिय कर्ज ('000) | 2,793 | 1,565 | 2,988 | 364 | 19 | 7,729 |
| पोर्टफोलियो शिल्लकबाकी (₹ करोड) | 5,675 | 3,306 | 6,402 | 800 | 49 | 16,232 |
| पोर्टफोलियो शिल्लकबाकीतील बाजार हिस्सा | 35% | 20% | 39% | 5% | 1% | 100% |
| वितरीत रक्कम (₹ करोड) – OND'20 | 2,013 | 667 | 1,869 | 74 | 5 | 4,628 |
| सरासरी तिकीट आकार (₹)– OND'20 | 27,676 | 32,643 | 38,697 | 40,474 | 37,186 | 32,265 |
| 30+ कसूर (POS) | 16.30% | 19.39% | 17.54% | 22.59% | 43.41% | 17.81% |
| 90+ कसूर (POS) | 5.39% | 10.59% | 9.66% | 2.85% | 12.46% | 8.03% |

- अखिल भारतीय MFI पोर्टफोलियो मधे सक्रिय कर्ज आणि पोर्टफोलियो शिल्लकबाकी साठी महाराष्ट्राचे योगदान 7टक्के आहे.
- पोर्टफोलियो शिल्लकबाकीत NBFC-MFI चे 39 टक्के योगदान आहे.
- अन्य कर्जदात्यांच्या तुलनेत महाराष्ट्रामधे NBFC ची ATS सर्वाधिक आहे.
- अन्य कर्जदात्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात NBFC ने90+कसूर अतिशय चांगले ठेवले आहे.

# महाराष्ट्र : कर्जवितरण कल


कर्ज संख्या ('000)

| तिकीट साइज | OND' 19 | JFM' 20 | AMJ' 20 | JAS' 20 | OND' 20 |
|---|---|---|---|---|---|
| 0K-10K | 106 | 74 | 6 | 31 | 258 |
| 10K-20K | 154 | 135 | 75 | 145 | 143 |
| 20K-30K | 495 | 486 | 13 | 130 | 315 |
| 30K-40K | 478 | 486 | 14 | 130 | 235 |
| 40K-50K | 187 | 223 | 6 | 95 | 165 |
| 50K-60K | 132 | 154 | 6 | 62 | 151 |
| 60K Plus | 69 | 89 | 5 | 51 | 167 |
| एकूण | 1,621 | 1,647 | 125 | 644 | 1,434 |

कोष्टक-09

- वर्षगतवर्ष तुलनेत, वितरणाची संख्या महाराष्ट्रात 11.5टक्के  नी घटली तर अखिल भारतीय स्तरावर 3टक्के  नी वाढली.
- 60K Plus तिकीटदर श्रेणीत वर्षगतवर्ष 142टक्के  वाढ OND'19 ते OND'20 मध्ये दिसून आली आहे


# महाराष्ट्र : पोर्टफोलियोतील कल




- महाराष्ट्रात डिसेंबर2019 ते डिसेंबर 2020 या कालावधीत वर्षगतवर्ष 17टक्के वाढ झाली आहे.
- बँका कोविड कालावधीतून हळूहळू सावरत असून सप्टेंबर 2020 ते डिसेंबर 2020 या कालावधीत 2टक्के वाढ झाली पण याच कालावधीत NBFC मध्ये 15टक्के नकारात्मक वाढ झाली आहे.
- महाराष्ट्रात सर्व तिमाहीमध्ये NBFC-MFI चा बाजारातील हिस्सा सर्वाधिक आहे.

# महाराष्ट्र : 90+ कसूर कल

आलेख-10




- इतर तिमाही तुलनेत डिसेंबर 2020 मधे सर्व कर्जदात्यांमध्ये 90+कसूर दर सर्वात जास्त आहे.
- ना-नफा MFI साठी डिसेंबर 2020 मध्ये सर्वाधिक 12.46टक्के कसूर दर दिसून आला.

टीप : कसूर परिगणनाधारित पोर्टफोलियो शिल्लकबाकी




New Delhi
Jodhpur
Jaipur
Agra
Kanpur
NEPAL
Kathmandu
Ganges
Varanasi
INDIA
Bhopal
Nagpur
Kolkata
(Calcutta)



# महत्वाकांक्षी जिल्हे

# महत्वाकांक्षी जिल्हे - डिसेंबर 2020 अवलोकन

आलेख-11




आलेख-12




| महत्वाकांक्षी जिल्ह्यांचे वृद्धी विवरण | December 2017 | December 2020 | Growth % |
|---|---|---|---|
| सक्रिय ग्राहक प्रवेश (000) | 4,155 | 7,900 | 90% |
| वितरीत रक्कम (₹ करोड ) | 14,374 * | 23,914 ** | 66% |
| सक्रिय कर्ज (000) | 6,925 | 13,299 | 92% |
| पोर्टफोलियो शिल्लकबाकी (₹ करोड) | 11,175 | 28,256 | 153% |
| 30+ कसूर | 1.54% | 12.17% | - |
| 90+ कसूर | 0.75% | 4.12% | - |

कोष्टक-10

टीप: * जानेवारी 2017 ते डिसेंबर 2017 मधील कर्जवितरण
** जानेवारी 2020 ते डिसेंबर 2020 मधील कर्जवितरण. कसूर परिगणनाधारित पोर्टफोलियो शिल्लकबाकी

- डिसेंबर पर्यंत महत्वाकांक्षी जिल्ह्यांमधील 2020 एकूण ₹ 28,556 कोटी पोर्टफोलिओ शिल्लकबाकी मधे बँकांचे 42 टक्के योगदान असून त्यानंतर NBFC- MFI च36 टक्के योगदान आहे .
- सर्व महत्वाकांक्षी जिल्ह्यांमध्ये NBFC-MFI चा +90 कसूर दर सर्वाधिक आहे .
- डिसेंबर 2017 ते डिसेंबर 2020 पर्यंत पोर्टफोलियो शिल्लकबाकी मधे 153 टक्के तर वितरण रक्कमेत 66 टक्के वाढ झाली.




# आसाम

## अवलोकन

# आसाम अवलोकन - डिसेंबर 2020 तथा डिसेंबर 2019

आलेख-13


पोर्टफोलियो शिल्लकबाकी आणि 90+ कसूर दर




- बँकांनी डिसेंबर 2019 ते डिसेंबर 2020 काळात वर्षगतवर्ष 5 टक्के वाढ नोंदविली
- डिसेंबर 2019 आणि डिसेंबर 2020 मध्ये आसामच्या एकूण पोर्टफोलिओसाठी बँकांचे योगदान सर्वाधिक आहे
- डिसेंबर 2019 च्या तुलनेत डिसेंबर 2020 मध्ये सर्व कर्जदात्यांच्या 90+ कसूर दरामधे वाढ झाली आहे
- डिसेंबर 2020 मधे आसाममधील 90+ कसूर दर हा अखिल भारतीय 90+ कसूर दरापेक्षा जास्त आहे

# आसाम - कर्ज उत्पत्ती कल

आलेख-14




सरासरी तिकीट आकार (ATS) [₹]

| Lender Type | OND' 19 | OND' 20 | Y-o-Y growth rate % |
|---|---|---|---|
| Banks | 62,034 | 31,368 | -49% |
| SFBs | 39,932 | 40,898 | 2% |
| NBFC – MFIs | 30,734 | 25,975 | -15% |
| NBFCs | 32,989 | 40,733 | 23% |
| आसाम चा सर्वसमावेशक ATS | 48,524 | 30,259 | -38% |

कोष्टक-11

- सर्वसमावेशक कर्ज उत्पत्ति OND'19 ते OND'20 काळात 79 टक्के वाढली.
- OND'20 मधे आसामचा सर्वसमावेशक ATS OND'19 च्या तुलनेत ₹ 48,524 वरून ₹ 30,259 पर्यंत 38 टक्के घसरला.

# सिडबी बद्दल

भारतीय लघुउद्योग विकास बँकेची (सिडबी) स्थापना 1990 साली संसदेच्या अधिनियमनामान्वये झाली. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगक्षेत्राच्या (एमएसइ) प्रोत्साहन, वित्तपुरवठा आणि विकासाची तिहेरी कार्यावली अमलात आणण्यासाठी आणि तत्सम कार्ये करणाऱ्या संस्थांमध्ये समन्वय साधण्यासाठी सिडबीला प्रमुख वित्तीय संस्था म्हणून कार्य करण्यासाठी अधिकृत केलेले आहे. इतक्या वर्षामध्ये तिच्या विविध वित्तीय आणि विकासाच्या उपायांद्वारे बँकेने समाजाच्या विविध स्तरांतील लोकांच्या जीवनात स्थान मिळविले आहे. तिने एमएसएमइ च्या समग्र वर्णपटातील उपक्रमांवर प्रभाव टाकला आहे आणि एमएसएमइच्या परिसंस्थेतील अनेक विश्वासार्ह संस्थांशी सलग्न झाली आहे.

व्हिजन 2.0 अंतर्गत सिडबीने एमएसएमइ विभागाच्या माहितीची विषमता संबोधित करताना एमएसएमइ पल्स, एमएसएमइ चे आणि क्रिसायडेक्सचे हेल्थ ट्रॅकर, एमएसइ भावना व आकांक्षांचे मापन, इंडस्ट्री स्पॉटलाइट आणि उद्योगक्षेत्रांवर एक सर्वकष अहवाल आणि फिंटेक पल्स, मायक्रोफायनान्स पल्स शिवाय फिटनेस लेंडिंग विभागावरील क्रेडीट डेटा अंतरदृष्टी अशा अनेक उपक्रमांचे नेतृत्व केले.

# मायक्रोफायनान्स क्षेत्रामध्ये सिडबी

मायक्रोफायनान्स चळवळीला पाठींबा देत समावेशक वित्तविषयक कार्यावली पुढे नेण्यासाठी सिडबीने अग्रणी भूमिका बजावली आहे. मायक्रोफायनान्स अंतर्गत मार्च 2020 पर्यन्त बँकेने 100 पेक्षा अधिक एमएफआयना रुपये 19871 करोड एकत्रितपणे मंजूर केले आहेत. एमएफआयना वित्त पुरवठा आणि समन्यायी पाठबळ देण्यासह या संस्थांना क्षमता बांधणीचा आधार देऊन अनुपालन मूल्यांकनाच्या साधनांद्वारे कॉर्पोरेट संस्कृती आत्मसात करण्यात सिडबीची भूमिका अग्रणी राहीली आहे. मायक्रोफायनान्स उद्योगाच्या सुरवातीच्या नाजूक काळात हातात हात घेऊन तो पूर्णपणे विकसित उद्योग विभाग होण्यापर्यन्तचे पूरक समर्थन, आमच्या 8 भागीदार एमएफआयना एसएफबीज/ युनिव्हर्सल बँक्सचे संक्रमणात संचयन करणे. बाजारभावापेक्षा बऱ्यापैकी कमी व्याजदरात थेट सिडबी कडून (भागीदारी करारा द्वारे ) लघु कर्जांची उपलब्धता करण्याचा सूक्ष्म कर्ज पुरवठ्यातील पथदर्शी पुढाकार. 'प्रयास' या शीर्षकांतर्गत पिरॅमिडच्या पायथ्याशी असणाऱ्या सूक्ष्म ऋणकोंसाठी बाजारभावापेक्षा तुलनेने कमी व्याजदरात भागीदारी मॉडेल अंतर्गत 0.5 लाख ते 5 लाख पर्यन्तच्या लघु तिकीट आकाराच्या कर्जांचा विस्तार सिडबी बँक करत आहे.

# इक्विफॅक्स बद्दल

इक्विफॅक्स ही एक ग्लोबल इन्फॉर्मेशन सोल्युशन्स कंपनी आहे. जी विश्वासार्ह, अद्वितीय माहीतीचा वापर सृजनशील पृथक्करणात, तंत्रज्ञान आणि उद्योग कौशल्याचा उपयोग जगातील व्यक्ती व संस्थांना ज्ञानाचे अंतरदृष्टीत रुपांतर करून देण्यात करते. जे वैयक्तिक निर्णयात आणि माहितीपूर्ण व्यवसायात मदत करतात.

अटलांटा (जॉर्जिया, यूएसए) येथे मुख्यालय असलेली इक्विफॅक्स ही उत्तर अमेरिका, मध्य व दक्षिण अमेरिका, युरोप व आशिया पॅसिफिक विभागातील 24 देशांमध्ये गुंतवणूक व संचालन करते. स्टँडर्ड आणि पुअर (एस अँड पी) 500® निर्देशांकाची इक्विफॅक्स सदस्य असून तिच्या सामान्य भागांची (कॉमन स्टॉक) न्यूयॉर्क स्टॉक एक्स्चेंज (एनवायएसइ) वर EFX या चिन्हाखाली देवाणघेवाण होते. इक्विफॅक्सचे जगभरात 11,000 कर्मचारी आहेत. पत उद्योगातील 120 वर्षांच्या जागकतिक अनुभवाच्या वारश्यासह इक्विफॅक्स ने भारतीय बाजारात 2010 मध्ये आपली उपस्थिती प्रस्थापित केली आणि रिझर्व्ह बँकेने CIC म्हणून काम करण्याचा परवाना दिला. गत 9 वर्षात क्रेडीट ब्युरोमधे बँका, एनबीएफसी, एमएफआय आणि विमाकारांच्या समावेशासह 4000+ सदस्यांसह वाढ झाली. हे सदस्य लक्षावधी भारतीय ग्राहकांची जनसंख्या आधारीत आणि परतफेडीची माहीती प्रदान करतात. इक्विफॅक्सने 2014 मध्ये एका विश्लेषक व्यवसाय संस्थेच्या अधिग्रहणातून भारतातील आपल्या पाऊलखुणा अधिकच घट्ट केल्या. इक्विफॅक्स ॲनालिटिक्स प्रा. लिमिटेड ही इक्विफॅक्सच्या संपूर्ण मालकीची विश्लेषक संस्था आहे, जी अद्वितीय सानुकूलित विश्लेषणात्मक उपाय प्रदान करते जे व्यवसायांची कार्यक्षमता आणि ग्राहकांचे जीवन या दोघांना समृद्ध करते.


**अस्वीकरण**

मायक्रोफायनान्स पल्स (अहवाल) इक्विफॅक्स क्रेडीट इन्फॉर्मेशन सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड (इक्विफॅक्स) द्वारा तयार करण्यात आले. या अहवालाच्या वापराद्वारे वापरकर्ता या अस्वीकाराणच्या आधीन राहून त्याची स्वीकृती देतो. इक्विफॅक्सचे जे सभासद आहेत त्या मायक्रोफायनान्स संस्थांच्या डिसेंबर 2020 च्या पर्याप्त माहीती प्रदानावर आणि त्या माहीतीच्या सविस्तर तौलकनि प्रक्रियेवर आधारीत हा अहवाल आहे. इक्विफॅक्स अहवाल तयार करताना पुरेशी काळजी घेत असते. परंतु मायक्रोफायनान्स संस्थांनी सदर केलेल्या अयोग्य व चुकीच्या माहीतीमुळे अहवालात उद्भवत असलेल्या चुकांबाबत /त्रुटींबाबत इक्विफॅक्स उत्तरदायी असू शकत नाही. शिवाय, इक्विफॅक्स अहवालातील माहीतीच्या पूर्णतेची किंवा पर्याप्ततेची आणि/ किंवा कुठल्याही विशिष्ट उद्देशासाठी त्याच्या उपयुक्ततेची हमी देत नाही. किंवा, अहवालाच्या कुठल्याही उपयोगासाठी इक्विफॅक्स उत्तरदायी नाही आणि इक्विफॅक्स अशा सर्व उत्तरदायित्वाचा स्पष्टपणे अस्वीकार करते. हा अहवाल कुठल्याही उपयोजन,उत्पादन/ परिणामाच्या नकार/ अस्वीकृती अथवा स्वीकृतीची अनुशंसा करत नाही किंवा इक्विफॅक्स i)कर्ज देणे वा न देणे ii) व्यक्ती संबंधित/ संस्था संबंधित कुठल्याही आर्थिक व्यवहारात उतरणे वा न उतरण्याची अनुशंसाही करत नाही. या अहवालातील माहीती कुठल्याही प्रकारचा सल्ला स्थापित करत नाही आणि या अहवालातील माहीतीच्या आधारे कुठल्याही प्रकारचा निर्णय घेण्यापूवी वापरकर्त्याने त्याच्या मते योग्य असणारे सर्व आवश्यक विश्लेषण केले पाहीजे. या अहवालाचा वापर क्रेडीट इन्फॉर्मेशन कंपनीज (नियंत्रण) कायदा 2005, क्रेडीट इन्फॉर्मेशन कंपनीज रेग्युलेशन 2006, क्रेडीट इन्फॉर्मेशन कंपनीज रूल्स, 2006 मधील तरतुदी द्वारा नियंत्रित केला जातो. पूर्व परवानगी शिवाय या अहवालाच्या कुठल्याही भागाच्या प्रती तयार, वितरित वा प्रकाशित करू नये.

इंग्रजीतून मराठीत केलेल्या भाषांतरात काही अस्पष्टता / तफावत आढळल्यास, इंग्रजीतील संबंधित मजकूर/ संदर्भ ग्राह्य धरला जाईल.


**इंग्रजीतुन मराठीत केलेल्या भाषांतरात काही अस्पष्टता/ तफावत आढळल्यास, इंग्रजीतील संबंधित मजकुर/ संदर्भ ग्राह्य धरला जाईल.**

## संपर्क तपशील

इक्विफॅक्स क्रेडीट इन्फॉर्मेशन सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड
युनिट क्र. 931, 3 रा मजला, बिल्डिंग/ इमारत क्र. 9,
सॉलीटेअर कॉर्पोरेट पार्क , अंधेरी घाटकोपर लिंक रोड ,
अंधेरी (पूर्व), मुंबई - 400 093

टोलफ्री क्र.: 1800 2093247
ecissupport@equifax.com

भारतीय लघुउद्योग विकास बँक (सिडबी)
स्वावलंबन भवन, प्लॉट नं. सी-11, 'जी' ब्लॉक,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व ),
मुंबई - 400 051 महाराष्ट्र

टोलफ्री क्र.: 1800 226753
www.sidbi.in/en

प्रकाशन अधिकार ® 2021 इक्विफॅक्स इंकॉ. अटलांटा, जॉर्जिया. सर्व हक्क राखीव. इक्विफॅक्स हे इक्विफॅक्स (इंक.)चे नोंदणीकृत व्यापार चिन्ह आहे.